# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.09.2024** **वार – मंगळवार**

---

**राष्ट्रपती दौरा**

सर्व शैक्षणिक संस्थांना मुलींसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याचं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. महिला आपल्या देशाच्या विकासाचा अविभाज्य भाग असल्याचं आग्रही प्रतिपादन त्यांनी केलं. पुण्यातील सिम्बायोसिस विद्यापीठाच्या 21 व्या दीक्षांत समारंभात त्या आज बोलत होत्या. दीक्षांत समारंभात 11 सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांपैकी 8 मुली होत्या याबद्दल कौतुक करुन त्यांनी लैंगिक समानतेवर भर देऊन सर्वसमावेशक विकासासाठी विद्यापीठ करत असलेल्या प्रयत्नांचं कौतुक केलं.मूल्याधारित शिक्षण देणं आणि विद्यार्थ्यांना समाजाची संस्कृती आणि गरजा समजावून सांगणं हे शैक्षणिक संस्थांचे ध्येय असले पाहिजे, असं प्रतिपादन मुर्मू यांनी केलं . विशेषतः समाजातील वंचित घटकांना लक्षात घेऊन आरोग्य सेवा उत्पादनं विकसित करण्याची सूचनाही त्यांनी केली. विद्यापीठातील आंतरराष्ट्रीय विद्यार्थी त्यांच्या ज्ञानाचा आणि कौशल्यांचा उपयोग आपल्या देशात मानवतेच्या उन्नतीसाठी करतील, अशी आशाही राष्ट्रपतींनी व्यक्त केली.यावेळी राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन आणि राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते.विद्यापीठाचे कुलपती शां. ब. मुजुमदार यांनी राष्ट्रपतींच्या प्रेरणादायी कार्याचा गौरव केला. या विद्यापीठात शिकत असलेल्या 85 देशांच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रपतींना आपल्या देशांचे ध्वज सादर केले.

**राष्ट्रपति मुंबई**

महाराष्ट्र विधान परिषदेचा शताब्दी सोहळाही आज मुंबईत राष्ट्रपतींच्या उपस्थितीत झाला, यावेळी राज्य सरकारच्या राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीनं 2021-22 या वर्षातील उत्कृष्ट भाषण पुरस्कार प्रदान करण्यात आले. या समारंभात पुण्याचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनाही राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**अतिक्रमण वाढ**

पुणे शहरातील अतिक्रमण निरीक्षक आणि सहायक अतिक्रमण निरीक्षकांचे हितसंबंध तयार होत असल्यानं अतिक्रमणं वाढत आहेत. त्यामुळे आता हा प्रकार रोखण्यासाठी दर तीन महिन्यांनी या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याचं धोरण अतिक्रमण विभागानं तयार केलं आहे. पुणे महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे प्रमुख आणि उपायुक्त सोमनाथ बनकर यांनी पत्रकारांना ही माहिती दिली.
हा प्रस्ताव अतिरिक्त आयुक्त आणि आयुक्तांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे.

**गणेशोत्सवात वैद्यकीय सुविधा**

यंदाच्या गणेशोत्सवात गर्दीच्या ठिकाणी दुचाकीस्वार वैद्यकीय सुविधा देणार आहेत. यासाठी 30 रुग्णवाहिका आणि 40 दुचाकीस्वार गणेशोत्सवात वैद्यकीय सेवेसाठी सज्ज झाले आहेत.आरोग्यसेवा आपल्या दारी, अंतर्गत हे अभियान राबवण्यात येणार आहे . तुळशीबाग सार्वजनिक गणपती मंडळ ट्रस्ट, हुतात्मा बाबू गेनू मंडळ ट्रस्ट, श्री गजलक्ष्मी ट्रस्ट ,आम्ही पुणेकर संस्था यांच्या वतीनं आणि रायडर्स ऑफ दख्खन यांच्या सहकार्यानं या रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**गणेशोत्सव महावितरण**

यंदाच्या गणेशोत्सवात सार्वजनिक मंडळांना महावितरणकडून विनाविलंब तात्पुरत्या नवीन वीज जोडण्या देण्यात येत आहेत. सर्वधर्मीयांच्या उत्सवासाठी घरगुती दरानं वीजदर आकारण्यात येत असल्यामुळं सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांनी अधिकृतपणे तात्पुरती वीजजोडणी घ्यावी असं आवाहन महावितरणकडून करण्यात आलं आहे.

**निर्मळ रानवारा**

मुलांमध्ये लेखन-वाचन संस्कृतीची जोपासना करायला हवी. यासाठी 'निर्मळ रानवारा'सारखं व्यासपीठ उपयुक्त आहे," असं मत पुणे मराठी ग्रंथालयाचे कार्यवाह सुधीर इनामदार यांनी व्यक्त केलं. सुश्री फाउंडेशन आणि वंचित विकास यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या कार्यक्रमात इनामदार बोलत होते. यावेळी वि. ल. शिंत्रे कथा स्पर्धेच पारितोषिक वितरण , इंदिरा गोविंद पुरस्कारांचे वितरण आणि 'निर्मळ रानवारा'च्या कथा विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आलं.

**क्रिकेट लीग**

पुण्यात तिसर्या ‘स्पोटर्सफिल्ड मान्सुन लीग’ अजिंक्यपद 14 वर्षाखालील 30-30 षटकांच्या क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. यामध्ये स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट ॲकॅडमीनं क्रिकेट नेक्स्ट ॲलकॅडमीचा 72 धावांनी सहज पराभव केला. तर दुसऱ्या सामन्यात स्पार्क्स क्रिकेट ॲकॅडमीनं 2एन क्रिकेट ॲ्कॅडमीचा 7 गडी राखून सहज पराभव केला.

**फुटबॉल**

पुण्यात पीडीएफए तृतीय श्रेणी विभागाच्या फुटबॉल लीग स्पर्धा सुरू आहेत. यामध्ये सिटी एफ सी, संघाने व्ही ओ बी ए संघावर 4-3 अशी निसटती मात करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. अन्य दुसऱ्या सामन्यात गोलशून्य बरोबरीनंतर टायब्रेकरमध्ये संघवी एफसी संघानं मॅथ्यू एफ ए संघाचा 3-2 असा पराभव करत उपांत्य फेरीतील आपलं स्थान पक्कं केलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज सकाळपासून ढगाळ हवामानासह पावसाच्या हलक्या सरी पडत आहेत.आज कमाल तापमान 28 अंश तर किमान तापमान 22 पूर्णांक 9 अंश सेल्सिअस इतकं नोंदवल गेलं असून उद्यासुद्धा साधारण अशाच स्वरूपाचं हवामान राहील असा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**